# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२४

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक १२ जुलै, २०२४ / आषाढ २१, १९४६ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| (१) | सहकार मंत्री | |
| (२) | महसूल, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास मंत्री | |
| (३) | वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री | |
| (४) | आदिवासी विकास मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (५) | कृषी मंत्री | |
| (६) | रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री | |
| (७) | मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २४**

---

### राज्यात कोकणासह काही जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात होत असलेली अवैध वृक्षतोड व तस्करी रोखण्याबाबत

**(१) * ८००३६ श्री.राजन साळवी (राजापूर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण):** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: कोकण, नांदेड, जळगांव, वाशिम, सांगली, पुणे, परभणीसह इतर जिल्ह्यांमध्ये विकासाच्या नावाखाली विविध जातीच्या वृक्षांची विनापरवानगी अवैधरित्या मोठ्या प्रमाणात वृक्षतोड व वाहतूक होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विशेषत: जिंतूर (जि.परभणी) येथील मुख्य महामार्गासह ग्रामीण भागात, मालेगाव (जि.वाशिम) वनपरिक्षेत्रांतर्गत जऊलका रेल्वे, अमाना व किन्हीराजा वन वर्तुळात, रावेर (जि.जळगांव) तालुक्यातील हतनूर वन विभागांतर्गत, लोहा (जि.नांदेड) तालुक्यातील माळाकोळी, सावरगाव, सोनखेड, कळंबर या परिसरात, जत व वाळवा (जि.सांगली) तालुक्यात, कोथरुड-तळजाई-हिंजवडी (जि.पुणे) तालुक्यात, डोंगरी (ता.तुमसर, जि.भंडारा) येथे विनापरवानगी व बेकायदेशीररित्या वृक्षतोड व तस्करी होत असल्याचेही माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वृक्षलागवडीकरिता शासन कोट्यवधी रुपये खर्च करीत असताना अवैध वृक्षतोडीमुळे पर्यावरणावर विपरित परिणाम होवून अनेक जिल्ह्यांमध्ये तापमानवाढीसह पाणी टंचाईचा गंभीर प्रश्न निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संबंधित विभागाचे याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्यामुळे वनसंपदेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या सर्व प्रकरणांची शासनाने सखोल चौकशी करुन अवैध वृक्षतोड रोखण्याबाबत तसेच संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) कोकण विभागातील ठाणे, छत्रपती संभाजीनगर वनवृत्तातील नांदेड व परभणी, तसेच यवतमाळ वनवृत्तातील वाशिम जिल्ह्यात विकासाच्या नावाखाली विविध जातीच्या वृक्षांची अवैधरित्या मोठ्या प्रमाणात वृक्षतोड व वाहतूक होत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

तथापि, जिंतूर (जि.परभणी) तालुक्यात राष्ट्रीय महामार्ग क्र.७५२-I देवगांव फाटा ते चारठाणा रस्ता रुंदीकरणातील आडजात ३५५ झाडे, राष्ट्रीय महामार्ग क्र.७५२-I जिंतूर ते शिरडशहापूर रस्त्यामधील ११९६ झाडे तोडण्यास वृक्षअधिकारी तथा वनपरिक्षेत्र (प्रा.) परभणी यांनी दिनांक ६.४.२०२३ व २०.९.२०२३ च्या आदेशानुसार परवानगी दिली आहे. परंतु, जिंतूर येथे एकूण १५ अवैध वृक्षतोडीचे गुन्हे नोंदविण्यात आले असून, सदर १५ गुन्ह्यांमध्ये एकूण ८१ वृक्षांची संख्या आहे.

मालेगाव, जि.वाशिम वनपरिक्षेत्राअंतर्गत जऊळका रेल्वे, अमाना व किन्हीराजा वन वर्तुळात वृक्षांची कत्तल करुन तस्करी करीत असल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेली नाही. परंतु, सदर भागातील कास्तकार वर्ग शेती करण्यासाठी अडचण निर्माण करणारे शेतातील झाडे परवानगी घेऊन तोड केली असल्याचे निदर्शनास आले आहे.

जळगांव जिल्ह्यातील यावल वन विभागात हतनूर कालवा परिसरात अवैध वृक्षतोड सुरु असल्याचे संदेश प्राप्त झाले. चौकशीमध्ये जमिनीची मालकी पाटबंधारे विभागाची असलेल्या क्षेत्रात २३३ वृक्षांची तोड परवानगी न घेता केली असल्याचे आढळून आले आहे.

लोहा (जि.नांदेड) तालुक्यातील माळाकोळी, सावरगांव, सोनखेड, कळंबर या परिसरात प्रशासनाची परवानगी न घेता मोठ्या प्रमाणावर अवैध वृक्षतोड झालेली नाही.

सांगली वन विभागात पेठ ते सांगली महामार्गासाठी एकूण १०६२ झाडांची वृक्षतोड व वाहतूकीसाठी रितसर परवानगी देण्यात आली आहे. तथापि, माहे एप्रिल, २०२४ दरम्यान वनपरिक्षेत्र अधिकारी जत यांनी अवैध वाहतूकीचे ५ गुन्हे नोंद केली असून, त्यापैकी ४ गुन्ह्यांसंबंधी प्रत्येकी रु.६०००/- दंड ठोठविण्यात आला असून, १ गुन्ह्याची चौकशी अंतिम टप्प्यात आहे. तसेच शिराळा तालुक्यात अवैध वाहतूकीचे ३ गुन्हा नोंद करुन कायदेशीर कार्यवाही केली आहे. सदर गुन्ह्याची चौकशी अंतिम टप्प्यात आहे.

तसेच हिंजवडीच्या (जि.पुणे) दत्तवाडी हद्दीतील मालकी क्षेत्रात (गट नंबर ३८/१) ८०० झाडांची वृक्षतोड केल्याची घटना माहे एप्रिल, २०२४ दरम्यान घडल्याचे निदर्शनास आले आहे.

भंडारा वन विभागाअंतर्गत मौजा डोंगरी (ता.तुमसर, जि.भंडारा) येथे माहे जानेवारी, २०२४ ते माहे जून, २०२४ या कालावधीत विनापरवानगी व बेकायदेशीर वृक्षतोड व तस्करी होत असल्याचे निदर्शनास आले नाही.
(३) राज्यात वृक्षतोड होऊ नये, तापमानात वाढ होऊ नये, पाणी टंचाई होऊ नये तसेच वृक्षतोड थांबविण्यासाठी क्षेत्रीयस्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-

• वन अधिकारी/कर्मचारी यांचेकडून वनक्षेत्रात गस्त करुन नियत क्षेत्र तपासणी करणे, आढळलेल्या अवैध वृक्षतोडीबाबत कायदेशीर कार्यवाही करणे.

• वनगुन्ह्यासंबंधी गुप्त माहिती ग्रामस्थ खबरे यांच्याकडून प्राप्त करुन त्या आधारे धाडी टाकून अवैध माल जप्त करणे, अवैध वृक्षतोडीवर नियंत्रण ठेवणे.

• वनोपज नाक्यावर तपासणी करणे.

• ग्रामस्थांच्या सहभागातून वन व्यवस्थापन या कार्यक्रमाविषयी स्थानिक जनतेस महत्त्व विषद करुन त्याद्वारे जनजागृत्ती करणे.

• वनक्षेत्रात वनीकरण व जल व मृद संधारणाची काम हाती घेणे.

(४) व (५) जळगांव जिल्ह्यातील यावल वन विभागात दिनांक १.२.२०२४ रोजी हतनूर कालवा परिसरात पाटबंधारे विभागाच्या मालकीच्या जमिनीवर २३३ वृक्षांची अवैध वृक्षतोड प्रकरणी महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम, (विनियमन) १९६४ अन्वये व महाराष्ट्र जमीन महसूल (वृक्ष अधिकाराचे नियम इत्यादी) नियम, १९६७ (दुरुस्ती) २०१७ अन्वये वृक्ष अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी यावल पूर्व यांनी संबंधितावर दंडात्मक कारवाई केली आहे.

जिंतूर येथे एकूण १५ अवैध वृक्षतोडीचे गुन्हे नोंदविण्यात आले असून, सदर १५ गुन्ह्यांमध्ये एकूण ८१ वृक्षांची संख्या आहे. या १५ गुन्ह्यांपैकी १४ गुन्ह्यांबाबत कायदेशीर कार्यवाही करण्यात आली असून, १ गुन्हेबाबत चौकशी सुरु आहे.

तसेच हिंजवडीच्या (जि.पुणे) दत्तवाडी हद्दीतील मालकी गट नंबर ३८/१ मध्ये ८०० झाडांची वृक्षतोड केल्याची घटना निदर्शनास आल्याने दोषीवर महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) अधिनियम, १९६४ तसेच महाराष्ट्र जमीन महसूल (वृक्ष अधिकाराचे नियम इत्यादी) नियम, १९६७ (सुधारणा) २०१७ मधील तरतुदीनुसार प्रती वृक्ष १००० रुपये प्रमाणे एकूण रु.८.०० लक्ष इतका दंड आकारण्यात आला असून, दंडाची रक्कम शासन खाती जमा करण्यात आली आहे. तसेच वृक्षतोड करणाऱ्यास तोड केलेल्या वृक्षांच्या तिप्पट म्हणजेच २४०० वृक्षांची लागवड करण्याचे आदेश पारित केले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात पशुखाद्यांच्या किंमतीत झालेली दरवाढ कमी करण्याबाबत

**(२) * ८३५३९ श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पशुखाद्यांच्या किंमतीत प्रचंड प्रमाणात दरवाढ झाल्याने पशुपालक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडल्याचे माहे मे, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दूधाच्या उत्पन्नापेक्षा पशुखाद्याच्या चाऱ्यांसाठी अधिक खर्च होत असल्याने पशुपालन शेतकऱ्यास आर्थिकदृष्ट्या व्यवसाय परवडणारा नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पशुखाद्यांचे दर कमी करण्यासंदर्भात पशुपालक व दुग्ध उत्पादक शेतकरी यांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन पशुखाद्यांची दरवाढ नियंत्रणात आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) पशुखाद्याचे दर हे मागणी व पुरवठ्यावर आधारित आहेत.

राज्यात पशुखाद्य निर्मिती उद्योगास प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत २१ प्रकल्प प्रस्तावांना केंद्र शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच जागतिक बँक सहाय्यित स्मार्ट प्रकल्पांतर्गत १२ प्रकल्प प्रस्तावांना प्राथमिक मंजुरी प्राप्त झाली आहे. यामुळे राज्यातील पशुखाद्याची उपलब्धता वाढून त्यांचे दर नियंत्रणात राहण्यास मदत होणार आहे.

पशुपालकांना गुणवत्तापूर्व पशुखाद्य उपलब्ध होण्याकरिता शासन निर्णय दिनांक १४.०७.२०२३ अन्वये राज्यात आयएसआय मार्क (बीआयएस प्रमाणकाप्रमाणे) पशुखाद्याचे उत्पादन व विक्री करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

-----------------

## खानोटा (ता.दौंड, जि.पुणे) येथील उजनी धरणाच्या क्षेत्रात येणाऱ्या गावाचे पुनर्वसन पूर्ण करण्याबाबत

**(३) * ८३८०७ ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानोटा (ता.दौंड, जि.पुणे) या उजनी धरणाच्या संपादित क्षेत्रात येणाऱ्या गावाचे अंशतः पुनर्वसन झाले असून उक्त धरणाच्या फुगवटा क्षेत्रातील ओलाव्यामुळे बाधित घरांचे संपादन व पुनर्वसन प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २३ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीत केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिरिक्त जिल्हाधिकारी, पुणे यांनी प्रांत व तहसिलदार यांच्यासमवेत बैठक घेऊन पुनर्वसन प्रक्रिया पूर्ण करावी असे निर्देश मदत व पुनवर्सन मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उक्त गावाची पुनर्वसन प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) मौजे खानोटा येथील एकूण २८७ घरांपैकी ५०० तलांकाखालील ८९ घरांचे पुनर्वसन सन १९७५-७६ साली करण्यात आले आहे. उर्वरित १९८ घरांपैकी ५०० ते ५०४ तलांका मधील ७० घरांच्या पुनर्वसनास दिनांक ०७.११.१९९४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे. उर्वरित १२८ घरांना ओलावा येत असल्याने जागा देणे योग्य आहे, असे कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्र.८ यांनी दिनांक २५.०४.२०२३ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकरी, पुणे यांना कळविले आहे. त्यानुषंगाने या १२८ घरांचे संपादन करण्यास्तव आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांनी कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्र.८ यांना कळविले आहे. सदर संपादनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पुनर्वसनाची कार्यवाही संकल्पीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कृषी अवजारांची बिले महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाने प्रलंबित ठेवल्याबाबत

**(४) * ७९७१४ श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाने शेतकऱ्यांना कृषी अवजारे पुरविणाऱ्या कंपन्यांची बिले प्रलंबित ठेवल्याचे सिद्ध झाल्यामुळे सुक्ष्म लघु उपक्रम सुविधा परिषदेने महामंडळाला रुपये १४ कोटी ९१ लाख भरण्याचे आदेश दिले असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महामंडळातील अधिकाऱ्यांमुळे महामंडळाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन कृषी उद्योग विकास महामंडळाचे कामकाज योग्यरित्या होण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, या प्रकरणातील संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

सुक्ष्म लघु उपक्रम सुविधा परिषदेने महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाला रु.१४ कोटी ८० लाख इतकी रक्कम भरण्याचे आदेश दिनांक ३१/०१/२०२४ च्या लवाद निवाडानुसार दिले आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाने सन २०१०-११ ते २०१६-१७ या वर्षात कृषी आयुक्तालयाच्या मागणीनुसार हातफवारणी यंत्र पुरवठा करण्याचे आदेश मे.पडगीलवार ॲग्रो यांना दिले होते. त्यानुसार सदर कंपनीने रु.७१.११ कोटीचा पुरवठा महामंडळास केला होता. सदर व्यवहारामध्ये पुरवठ्यापोटी रक्कम प्राप्त झाल्यानंतर पुरवठा करणाऱ्या संस्थेस महामंडळामार्फत रक्कम अदा करण्यात येईल, अशा अटी व शर्ती वर करारनामा करण्यात आला आहे. करारनाम्यानुसार कंपनीस रु.६८.४८ कोटी इतकी रक्कम अदा करण्यात आलेली आहे. तसेच मे.पडगीलवार ॲग्रो यांनी पुरवठा केलेल्या स्पायरल सेप्रेटरबाबत तक्रारी प्राप्त झाल्यामुळे त्यांना द्यावयाची उर्वरित रक्कम रु.२.६३ कोटी अदा केलेली नाही. तथापि, मे.पडगीलवार कंपनीने उर्वरित रक्कम रु.३.२९ कोटी असल्याचे नमूद करुन व्याजासह मिळण्यासाठी सुक्ष्म लघु उपक्रम सुविधा परिषदेकडे दावा दाखल केला आहे. त्यानुषंगाने परिषदेने थकीत देय रक्कम व्याजासह एकूण रु.१४८० लाख पुरवठादारास देण्याबाबत आदेशित केले आहे. सदर आदेशाविरुध्द महामंडळाने जिल्हा सत्र न्यायालय, नागपूर येथे अपील क्र.CCD No.४५/२०२४ दाखल केले असून, प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील अंधेरी (पश्चिम) येथील कोकीलाबेन रुग्णालयास सेवाशुल्काची रक्कम माफ केल्याबाबत

**(५) * ८०८७७ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.चेतन तुपे (हडपसर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईच्या अंधेरी (पश्चिम) येथील सुमारे १२ हजार ५० चौरस मीटरचा भूखंड तत्कालीन हृदयरोगतज्ञ डॉ.नितू मांडके यांच्या वसंत हार्ट ट्रस्टला सामान्यांसाठी हृदयरोग संशोधन केंद्र आणि रुग्णालय उभारण्यासाठी शासनाने सन १९९७ मध्ये दिला असता त्यांचे निधन झाल्यामुळे उर्वरित बांधकाम त्यांचे पत्नीमार्फत व त्यानंतर उद्योगपती अनिल

अंबानी यांचेमार्फत पूर्ण करण्यात येवून रुग्णालयाचे नामकरण "कोकीलाबेन अंबानी रुग्णालय" असे करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने कोकीलाबेन अंबानी रुग्णालयाला भूखंड हस्तांतरणप्रकरणी तसेच अधिक चटईक्षेत्र वापरल्यामुळे दंडापोटी रु.१५० कोटीची अनर्जित रक्कम भरण्याचे आदेश जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी सन २०१४ मध्ये दिले होते, तसेच उक्त रुग्णालयाच्या २८५ चौ.मीटर जागेचा व्यापारी वापर केल्याप्रकरणी रुग्णालयास रु.२ कोटी ७० लाखांचा दंड ठोठावण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हाधिकारी, मुंबई उपगनर यांनी आदेशित केलेली सेवाशुल्काची रक्कम माफ करण्याचे आदेश तत्कालीन मा.महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दिले असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विश्वस्त बदलणे, भूखंडाचे हस्तांतरण, शासनाची परवानगी न घेता वाणिज्य वापर इत्यादीबाबत महालेखापालांनी आक्षेप नोंदवून ट्रस्टकडून एकूण रु.१७६ कोटी शासनाने वसूल करण्याचे आदेश दिल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) मौजे आंबिवली, ता.अंधेरी, मुंबई उपनगर जिल्हा येथील स.नं.१४१-अ न.भू.क्र.८३३ पै. या अभिन्यासातील भूखंड क्र.१ क्षेत्र १२,०५० चौ.मी. हा भूखंड मालती वसंत हार्ट ट्रस्ट संस्थेला हृदयरोग संशोधन केंद्र व रुग्णालय बांधण्यासाठी ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने मंजूर केला आहे. मालती वसंत हार्ट ट्रस्टच्या ट्रस्टींनी दिनांक ०९/०९/२०१० रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर केलेल्या निवेदनामध्ये डॉ.नितू मांडके यांच्या निधनानंतर मांडके फाऊंडेशनला निधीची कमतरता भासल्यामुळे रिलायन्स धिरुभाई अंबानी समूहाने व्याज न आकारता प्रकल्पासाठी आर्थिक सहाय्य देण्याचे मान्य केल्यामुळे ट्रस्टने रुग्णालयाचे नाव "कोकिलाबेन धीरुभाई अंबानी रुग्णालय आणि वैद्यकीय संशोधन संस्था" असे ठेवण्याचा निर्णय घेतला असल्याचे नमूद केले आहे.

(२) महालेखापाल, नागपूर यांचे कार्यालयातील लेखा परिक्षा पथकाने सन २०११ चे भाडेपट्टा प्रकरणांचे लेखा परिक्षण केले असता, त्यांनी "मालती वसंत हार्ट ट्रस्ट संस्थेला हृदयरोग संशोधन केंद्र व रुग्णालय बांधणेसाठी ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने 'एक विशेष बाब' म्हणून नाममात्र रु.१/- वार्षिक भुईभाडे आकारुन प्रदान केलेल्या जमिनीवर बांधण्यात आलेल्या रुग्णालयाच्या इमारतीचा वापर गिफ्ट शॉप, स्पा, ब्युटी सलून, फूड कोर्ट, रिलायन्स कंपनीचे ऑफीस इत्यादी वाणिज्य प्रयोजनासाठी करण्यात येत आहे. तसेच सदरचे रुग्णालय हे व्यावसायिक संस्थेकडे हस्तांरित झाले आहे. त्यांचेकडून शासन अनर्जित उत्पन्नाची रक्कम रु.१७६.२३ कोटी वसूल करणे आवश्यक आहे" असा लेखा परिच्छेद उपस्थित केलेला होता. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक २४/२/२०१२ रोजी रु.५७.८४ कोटी अनर्जित उत्पन्न वसूल करण्याबाबत आदेश पारित केले होते. तसेच मालती वसंत हार्ट ट्रस्ट यांना भाडेपट्ट्याने दिलेल्या जमिनीवरील इमारतीमध्ये काही भागाचा वाणिज्यिक वापर केल्यामुळे संबंधितांकडून शासनाच्या प्रचलित धोरणानुसार अनुज्ञप्ती शुल्क वसूल करण्याचे निर्देशही जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना शासन स्तरावरुन देण्यात आले आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी आकारलेली अनुज्ञप्ती शुल्काची रक्कम रु.२,७०,६५,६७५/- दिनांक २३/०२/२०२४ रोजी शासन जमा केली आहे.

(३) हे खरे नाही.

भाडेपट्टेदार संस्थेस कोणत्याही प्रकारच्या सेवाशुल्काची रक्कम भरणा करण्याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी आदेशीत केले नव्हते. त्यामुळे सेवाशुल्काची सदरची रक्कम माफ करण्याचे आदेश तत्कालीन मा.मंत्री

(महसूल) यांनी देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) महालेखापाल, नागपूर यांचे कार्यालयातील लेखा परिक्षा पथकाने सन २०११ चे भाडेपट्टा प्रकरणांचे लेखा परिक्षण केले असता त्यांनी "मालती वसंत हार्ट ट्रस्ट संस्थेला हृदयरोग संशोधन केंद्र व रुग्णालय बांधण्यासाठी भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या जमिनीवर बांधण्यात आलेल्या रुग्णालयाच्या इमारतीचा काही भागाचा वापर गिफ्ट शॉप, स्पा, ब्युटी सलून, फूड कोर्ट, रिलायन्स कंपनीचे ऑफीस इत्यादी वाणिज्य प्रयोजनासाठी करण्यात येत आहे. तसेच सदरचे रुग्णालयाचा काही भाग हे व्यावसायिक संस्थेकडे हस्तांतरित झाले आहे. त्यांचेकडून शासन अनर्जित उत्पन्नाची रक्कम रु.१७६.२३ कोटी वसूल करणे आवश्यक असल्याचे नमूद केले होते. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी रु.५७.८४ कोटी अनर्जित उत्पन्न वसूल करण्याबाबत आदेश पारित केले होते, हे खरे आहे. तथापि, याप्रकरणी तत्कालीन मा.मंत्री (महसूल) यांनी दिनांक १६/०५/२०१८ रोजी अर्धन्यायिक आदेश पारित केले आहेत. सदर अर्धन्यायिक आदेशामध्ये विविध न्यायालयाच्या आदेशांचा संदर्भ देऊन, एखाद्या न्यासाच्या विश्वस्तांमध्ये बदल झाल्यास न्यासाच्या मालमत्तेचे व्यवस्थापन करण्याचे अधिकार एका विश्वस्तांकडून दुसऱ्या विश्वस्तांकडे हस्तांतरित होत असतात. तथापि, त्यामुळे न्यासाच्या मालमत्तेचे/मिळकतीचे हस्तांतरण झाले असे समजता येत नाही, असा निष्कर्ष काढलेला आहे. तसेच आदेशात अर्जदार न्यासाच्या विश्वस्तांमध्ये बदल करण्यासाठी अथवा नवीन विश्वस्त समाविष्ट करण्यासाठी शासनाची पूर्वपरवानगी आवश्यक असल्याची कोणतीही अट अर्जदार संस्थेस जमीन प्रदान करणाऱ्या आदेशात अथवा जमीन प्रदान केल्यानंतरच्या सनदेमध्ये अंतर्भूत नसल्याने अर्जदार न्यासाच्या विश्वस्तांमध्ये बदल करण्यासाठी/विश्वस्तांमध्ये वाढ करण्यासाठी शासनाची पूर्व परवानगी आवश्यक असल्याचे दिसून येत नाही, असाही निष्कर्ष काढण्यात आला आहे. ही बाब विचारात घेता, प्रस्तुत प्रकरणी जमिनीचे हस्तांतरण झालेले नसल्यामुळे शासनाच्या प्रचलित धोरणानुसार अनर्जित उत्पन्न वसूल करता येणार नाही. यास्तव अनर्जित उत्पन्न वसूलीबाबतचे प्रकरण बंद करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना शासन स्तरावरुन देण्यात आले आहेत. तसेच मालती वसंत हार्ट ट्रस्ट यांना भाडेपट्ट्याने दिलेल्या जमिनीवरील इमारतीमध्ये काही भागाचा वाणिज्यिक वापर केल्यामुळे संबंधितांकडून शासनाच्या प्रचलित धोरणानुसार अनुज्ञप्ती शुल्क वसूल करण्याचे निर्देशही जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना शासन स्तरावरुन देण्यात आले आहेत.

(५) तत्कालीन मा.मंत्री (महसूल) यांनी दिनांक १६/०५/२०१८ रोजी पारित केलेल्या अर्धन्यायिक आदेशानुसार प्रस्तुत प्रकरणी जमिनीचे हस्तांतरण होत नसल्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चिंचणी (जि.पालघर) येथील खारफूटीचे जंगल नष्ट होत असल्याबाबत

**(६) * ८१२६४ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिंचणी (जि.पालघर) येथे ग्रामपंचायतीच्या बेकायदा कचराभूमीमुळे खारफूटीला मोठे नुकसान झाले असून, खारफूटीचे जंगल नष्ट होत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाडी परिसरात मातीचा बेकायदा भराव करुन त्यावर अनधिकृत बांधकामे उभारली जात असून या विरोधात शासनाकडे अनेकदा तक्रार करुन सुध्दा त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी व पाहणी करुन त्यावर अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांविरोधात कारवाई करण्याकरिता तसेच खारफूटीचे जंगल नष्ट होऊ नये यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) व (४) मौजे चिंचणी येथील गट क्र.२४७५/१ येथील १०-२७.८७ हे.आर क्षेत्र सी.आर.झेड ने बाधित होत असलेल्या क्षेत्रावर ग्रामपंचायतीचा घनकचऱ्याची विल्हेवाट केली जात असल्याचे निदर्शनास आले असून खारफूटी तसेच कांदळवनाचा ऱ्हास झालेला नसल्याचे स्थळपाहणी अहवालात दिसून आले आहे. सदर ग्रामपंचायतीने घनकचरा व्यवस्थापनासाठी जमिनीची मागणी केली असता, मागणी केलेले कांदळवन क्षेत्र असल्याने त्याचा ऱ्हास होण्याची शक्यता लक्षात घेता प्रस्ताव नाकारण्यात आला आहे.

मौजे चिंचणी ता.डहाणू, जि.पालघर खाडी क्षेत्रात कोणत्याही प्रकारचा बेकायदा मातीचा भराव अथवा अनधिकृत बांधकामे उभारली जात नाहीत. तथापि, मौजे चिंचणी येथील सरकारी जागेवर बेकायदेशीर सिआरझेड मध्ये बांधकामे होत असल्याबाबतची तक्रार श्री.दुभाष राजाराम अंभिरे, यांनी जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडे दिनांक २५.०४.२०२४ व १३.०६.२०२४ च्या पत्रान्वये केली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, पालघर यांनी तालुका सिआरझेड समिती अध्यक्ष तथा उपविभागीय अधिकारी, डहाणू व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांना तपासणी करण्याचे निर्देश दिले आहेत.

तसेच मौजे चिंचणी येथील गट क्र.२४७५/१ च्या क्षेत्रात अंदाजे २५.०० हे.आर शेतीसाठी व अंदाजे २१.०८ हे.आर क्षेत्रावर घरासाठी अतिक्रमणे केल्याचे आढळून आलेले असून प्रचलित नियमानुसार कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

-----------------

## नवापूर (जि.नंदुरबार) तालुक्यातील राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत रस्त्यांची कामे निकृष्ट झाल्याबाबत

**(७) * ८२०२१ श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवागांव, डोकारे, पांघराण, रायंगण, उमराण व देवमोगरा (ता.नवापूर, जि.नंदुरबार) येथील रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रिटीकरणाची राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत करण्यात आलेली कामे निकृष्ट दर्जाची झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामे निकृष्ट दर्जाची असतानाही ठेकेदार व उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम यांनी ग्रामपंचायतीची ताबा पावती न घेता संगनमताने परस्पर बिले काढून शासनाची आर्थिक फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निकृष्ट कामांबाबत लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी शासनाकडे तक्रारी करुनही शासनस्तरावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत तसेच संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) होय, अशी तक्रार प्राप्त झाली होती.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) डॉ.हिना गावित, तत्कालीन मा.लोकसभा सदस्य, नंदुरबार यांनी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत नवागांव, डोकारे, पांघराण व रायंगण (ता.नवापूर) या गावांतील कामांबाबत तक्रार वजा निवेदन दिले होते. त्यानुषंगाने सदर कामांची कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत

चौकशी करण्यात आली होती. तथापि, एकुण २० कामांपैकी १६ गावातील सर्व कामे मनरेगा अटी व शर्तीनुसार पुर्ण झालेबाबत प्रत्यक्ष पाहणी दरम्यान निदर्शनास आले आहे, असे निवेदन डॉ.हिना गावित यांनी शासनास दिले होते. सदर निवेदनाच्या अनुषंगाने कामांची चौकशी करुन देयके अदा करण्याबाबत शासनस्तरावरुन कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने चौकशी करुन देयके अदा करण्याबाबत प्राप्त शिफारशीस अनुसरुन सदर कामांच्या देयकाची रक्कम विहीत कार्यप्रणालीद्वारे आहरीत करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौ. शेंडूग (ता.पनवेल, जि.रायगड) येथे अनधिकृत गौण खनिज उत्खनन केल्याबाबत

**(८) * ८०६९९ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौ. शेंडूग (ता.पनवेल, जि.रायगड) येथील मिळकत जमिनीमधून बेकायदेशीररित्या ९६६ ब्रास गौण खनिजाचे उत्खनन केल्याचे दिनांक २१ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी झालेल्या उत्खननामुळे परिसरातील शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होऊन त्याचा पर्यावरणावर विपरित परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन बेकायदेशीर उत्खनन रोखण्याबाबत तसेच संबंधितांवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) व (४) मंडळ अधिकारी, पोयंजे यांनी मौजे शेंडूग, ता.पनवेल, जि.रायगड येथील सर्व्हे नं.९२/अ/१ क्षेत्राचे मालक यांनी ९६६ ब्रास गौण खनिज उत्खनन केल्याबाबत अपर तहसिलदार, पनवेल यांना अहवाल सादर केला असता, अपर तहसिलदार, पनवेल यांनी अध्यक्ष, सेंट विल्फ्रेड एज्युकेशन सोसायटी यांना दिनांक १५.०३.२०२४ रोजी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम ४८ (७) अन्वये नोटीस बजाविण्यात आली असून, नोटीसच्या अनुषंगाने संबधितांनी खुलासा सादर केला असून, सदर प्रकरण सुनावणीवर प्रलंबित आहे.

-----------------

## उसर (ता.अलिबाग, जि.रायगड) येथे खाडी मार्गाने होणारी मालवाहू जहाजांची रहदारी थांबविण्याबाबत

**(९) * ८३५७९ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उसर (ता.अलिबाग, जि.रायगड) येथे सुरु असलेल्या गेल कंपनीच्या पॉलीमर प्रकल्पासाठी लागणाऱ्या मोठ्या यंत्रसामुग्रीची वाहतूक खाडीमार्गाने करण्यात येत असल्याने स्थानिक मच्छीमार बांधवांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अलिबाग, आक्षी-साखर या खाडीतून होणारी मालवाहू जहाजांची रहदारी थांबविण्यात यावी, अशी मागणी अलिबाग मच्छीमार सोसायटीच्यावतीने महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन उक्त मागणीनुसार मालवाहू जहाजांची रहदारी थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) मच्छिमारांचे नुकसान होऊ नये याबाबत योग्य ती खबरदारी घेऊन अलिबाग-साखर आक्षी खाडीतून बार्ज वाहतूक करण्यासंदर्भात दिनांक ०१.०७.२०२४ रोजी मच्छिमार सोसायट्यांचे पदाधिकारी आणि मे.कोकण बार्ज बिल्डर्स प्रा.लि. कंपनीचे प्रतिनिधी यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीमध्ये दोन्ही पक्षांनी परस्परांना सहकार्य करण्याचा

सर्वसंमत तोडगा काढण्यात आला आहे, असे महाराष्ट्र सागरी मंडळ, मुंबई यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पिंपळगांव कान्हा (ता.महागांव, जि.यवतमाळ) येथील पतसंस्थेत आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१०) * ८३८१३ श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळगांव कान्हा (ता.महागांव, जि.यवतमाळ) येथील बाबासाहेब नाईक सुतगिरणी सेवकांची सहकारी पतसंस्था मर्या. रजि.नं.७६२ कार्यकारी संचालक श्री.एम.आय.पाथरी या पतसंस्थेच्या संचालकांनी संगनमत करुन जाणीवपूर्वक व हेतूपुरस्सर पतसंस्थेतून आर्थिक गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करुन संबंधितांवर तात्काळ योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याबाबत श्री.सुनिल भालेराव, सहा.निबंधक, सहकारी संस्था, पुसद यांना श्री.पंजाबराव देशमुख, रा.खडका (ता.महागांव) यांनी पुराव्यासहित दिनांक १२ जानेवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास लेखी तक्रार केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१), (२) व (३) बाबासाहेब नाईक सूतगिरणी सेवकांची सहकारी पतसंस्था मर्या., पिंपळगांव कान्हा, ता.महागांव, जि.यवतमाळ या पतसंस्थेच्या कार्यकारी संचालक श्री.एम.आय.पाथरी यांनी केलेल्या अनियमीत कर्जवाटपासंदर्भात श्री.पंजाबराव देशमुख यांनी लेखी तक्रार सहायक निबंधक, सहकारी संस्था, पुसद यांना दिली आहे.

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सहकार अधिकारी, श्रेणी-१, सहकारी संस्था, महागाव यांनी दिनांक २१/०६/२०२४ रोजी सादर केलेल्या चौकशी अहवालामध्ये कर्ज मर्यादेचे उल्लंघन आणि सभासदांकडील थकीत कर्ज वसूली या मुद्यांबाबत अनियमितता निदर्शनास आली आहे. त्यानुषंगाने सहायक निबंधक, सहकारी संस्था, पुसद यांनी अधिनियमाचे कलम ७९ (१) व कलम १४४-२४ अन्वये कर्जमर्यादेचे उल्लंघन करुन वाढीव कर्ज मंजूर केले आहे, अशा सभासदांकडून वाढीव कर्जाची वसूली आणि सेवानिवृत्त झालेल्या सभासदांकडून थकीत कर्जाची वसूली पी.एफ. मधून करण्याचे निर्देश दिनांक २७/०६/२०२४ रोजीच्या आदेशान्वये संस्थेला दिलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौ. दावडी (ता.खेड, जि.पुणे) येथील शासकीय जमीन ताब्यात घेतल्याबाबत

**(११)** * **८३८७०** **श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ. दावडी (ता.खेड, जि.पुणे) येथील ग्रामपंचायत मिळकती क्रमांक ७६३, ५९८, ५९९, ६०० व ४६० या पाच शासन मालकीच्या मिळकती सन २०२३ मध्ये खाजगी व्यक्तींच्या नावे करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शासन मालकीच्या जमिनीसंबंधित खाजगी व्यक्तींच्या नावे करताना, जुन्या शासकीय दस्तऐवजांमध्ये खाडाखोड करणे, अस्तित्वात नसलेले पुरावे ग्राह्य धरणे, सन १९७५ मधील चौकशी चुकीची दर्शवून ग्रामपंचायतीच्या सन २०२१ चा ठराव ग्राह्य धरणे इत्यादी गैरप्रकार करुन कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणात जिल्हा भूमी अधिक्षक, भूमी अभिलेख, पुणे व उप अधिक्षक, भूमी अभिलेख, खेड, मु.राजगुरुनगर यांचा सहभाग असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन शासकीय जमिनी ताब्यात घेण्याबाबत तसेच यातील दोषी व जबाबदार अधिकारी यांचेविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे नाही.

तथापि, मौजे दावडी (ता.खेड, जि.पुणे) येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.७६३, ५९८, ५९९, ६०० व ४६० या मिळकतीस सन १९७४ साली महाराष्ट्र शासन हे नाव दाखल झाल्याने संबंधितांनी जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख यांचेकडे अपील अर्ज दाखल केला होता. जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख, पुणे यांनी दिनांक ०४/०५/२०२२ रोजीच्या आदेशान्वये सदर अपील उप अधिक्षक, भूमी अभिलेख यांचेकडे फेरचौकशीकरीता पाठविले होते.

उप अधिक्षक, भूमी अभिलेख, खेड यांनी चौकशीअंती दिनांक २१/१२/२०२२ रोजीच्या आदेशान्वये खाजगी धारकांची नावे दाखल केली आहेत.

तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांच्या दिनांक २६/०६/२०२४ रोजीच्या अहवालानुसार सदर मिळकतींचे नमूना ८-अ पाहता सन १९५५-५६ पासून संबंधित धारकांची नावे आहेत. सदर मिळकतीमध्ये ग्रामपंचायतीने आजअखेर कोणतेही बदल केलेले नाहीत.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौ. इल्लुर (ता.चामोर्शी, जि.गडचिरोली) येथील तलावामध्ये नियमित मासेमारी करण्याची परवानगी देण्याबाबत

**(१२)** * **८३६७६** **डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.इल्लुर (ता.चामोर्शी, जि.गडचिरोली) येथील तलावात श्री वाल्मिकी मच्छीमार सहकारी संस्थेच्या व समाजाच्या माध्यमातून सन २०१८ पर्यंत नियमित मासेमारी करण्यात येत होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मात्र चौडमपल्ली वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी अचानक कोणतेही कारण न देता मासेमारी बंद करण्याची सक्त ताकीद दिल्याने येथील मासेमारी बंद करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तलावातील मासेमारी बंद केल्याने वाल्मिकी व इतर समाजावर अन्याय झाला असून मासेमारी करणाऱ्या समाजाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून या समाजातील कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर तलावात मासेमारी करण्यासाठी नियमित परवानगी द्यावी, अशी मागणी करणारे निवेदन वाल्मिकी समाज बांधवांच्यावतीने देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन सकारात्मक निर्णय घेण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

चपराळा वन्यजीव अभयारण्य दिनांक २५.०२.१९८६ च्या शासन अधिसूचनेन्वये घोषित करण्यात आले आहे. अभयारण्यातील राखीव वनखंड क्रमांक २२३ मध्ये इल्लुर तलाव अस्तित्वात असून सन १९८९-९० मध्ये सदर क्षेत्र वन्यजीव विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे.

सदर क्षेत्रात वन्यजीवांचा अधिवास असल्याने वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ चे कलम २७ नुसार अभयारण्य क्षेत्रात प्रवेशास प्रतिबंध आल्यामुळे वनपरिक्षेत्र अधिकारी, चौडमपल्ली यांचेकडून मासेमारीस प्रतिबंध करण्यात आला आहे.
(४) इल्लुर तलावात मासेमारी करण्यासाठी लिलाव करण्याची परवानगी देण्याकरीता सचिव ग्रामपंचायत, इल्लुर यांचेकडून सन २०२१ मध्ये वनपरिक्षेत्र अधिकारी, चौडमपल्ली यांचेकडे मागणी करण्यात आली होती.

तथापि, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ च्या तरतूदीनुसार अभयारण्य क्षेत्रात प्रवेशास प्रतिबंध असल्याने सदर परवानगी देता येत नसल्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी, चौडमपल्ली दिनांक ०२.१२.२०२१ पत्रान्वये सचिव ग्रामपंचायत, इल्लुर यांना कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कळणे (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदूर्ग) येथील गावात गौण खनिजाची अवैधरित्या व विनापरवाना वाहतूक केली जात असल्याबाबत

**(१३) * ७९६४९ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळणे (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदूर्ग) येथील गावात दोडामार्ग तहसिलदार, मंडल अधिकारी व तलाठी यांच्या संगनमताने उगाडे रस्त्याच्या ठिकाणी अवैधरित्या व विनापरवाना दगड खाणी, खडी क्रशर व गौण खनिजाचे उत्खनन व वाहतूक केली जात असल्याचे दिनांक ६ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित वाहतूकदार तसेच दोषी अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२) व (३) मौजे कळणे ता.दोडामार्ग, जि.सिंधुदूर्ग येथील गावात दोडामार्ग, तहसिलदार मंडळ अधिकारी, तलाठी या सर्वांना धरुन उगाडे रस्त्यावर खाण फुटलेल्या जागेच्या ठिकाणी अवैध दगड खाणी, खडी क्रशर गौण खनिजाची बेकायदेशीर मोरगांव येथे वाहतूक केली जात असल्याचे दिनांक ६ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले नाही.

मौजे आडाळी व मोरगांव येथे शासनाने दिलेल्या अधिकृत वाहतूक पाससहीत मायनिंगची माती साठवणूक, माती खरेदी विक्री, वजनकाटा ठेवणे व माती चाळणी करण्यासाठी तहसीलदार दोडामार्ग यांचे कार्यालयाकडून ६ परवानाधारक यांना तात्पुरती अकृषिक परवानगी आदेश देण्यात आले होते. परंतु, सदर परवानाधारक यांनी सदर आदेशातील अटी व शर्तीचा भंग (वाहतूक कोंडी) केल्याबाबत तलाठी मोरगाव ता.दोडामार्ग यांनी दिनांक १९.०४.२०२४ रोजी दिलेल्या अहवालानुसार सदर परवानाधारक यांना देण्यात आलेली तात्पुरती बिनशेती आदेश दिनांक २०.०४.२०२४ रोजी रद्द केले आहे.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## रोहणखेडा-पर्वतापूर (जि.अमरावती) येथील प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(१४) * ८२२९८ ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोहणखेडा-पर्वतापूर (जि.अमरावती) येथील प्रकल्प बाधितांचे अद्याप पुनर्वसन करुन त्यांना मोबदला देण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी तातडीने कार्यवाही करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी यांना दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन देवूनही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करुन प्रकल्प बाधितांचे तातडीने पुनर्वसन करुन त्यांना मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

पेढी बॅरेज उपसा सिंचन ता.जि. अमरावती या प्रकल्पांतर्गत बुडीत क्षेत्रात बाधित होणाऱ्या रोहणखेडा व पर्वतापूर यांना दोन्ही गावातील ४६४ बाधित कुटूंबांपैकी २३३ कुटूंबांनी नियमित वाही पुनर्वसन व २३१ कुटूंबांनी ऐच्छिक पुनर्वसनाचा प्रस्ताव कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचे मार्फत मा.अपर मुख्य सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सादर करण्यात आला होता.

त्यानुषंगाने मा. मुख्यमंत्री तथा अध्यक्ष, राज्य पुनर्वसन प्राधिकरण तथा राज्य पुनर्वसन व पुनर्स्थापना संनियंत्रण समिती यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २६.७.२०२३ व १८.१२.२०२३ रोजी झालेल्या महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरण तथा राज्य पुनर्वसन व पुनर्स्थापना संनियंत्रण समितीच्या बैठकीमध्ये धोरण प्रस्तावित करण्यात आले होते व सदर बैठकीमध्ये सदर प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

महसुल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक ८.२.२०२४ अन्वये पेढी बॅरेज उपसा सिंचन ता.जि. अमरावती या प्रकल्पांतर्गत बुडीत क्षेत्रात बाधित होणाऱ्या रोहणखेडा व पर्वतापूर दोन्ही गावातील ४६४ बाधित कुटूंबांपैकी २३१ कुटूंबासाठी ऐच्छिक पुनर्वनाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुषंगाने या प्रकल्पांतर्गत बाधित कुटुंबाना आर्थिक पॅकेजसाठी आवश्यक रकमेची परिगणना करणे, निधी उपलब्ध करणे आणि अंमलबजावणी करणे या बाबी प्रकल्पयंत्रणा जलसंपदा विभाग यांनी करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

तसेच २३३ कुटुंबांनी नियमित पुनर्वसनाची मागणी केली असून नियमित पुनर्वसनाकरिता मोजा रामगांव येथे ६.०० हे. आर शासकीय जमीन व ९.०० हे आर खाजगी जमीन संपादनाची कार्यवाही सुरु आहे.

शासन निर्णयातील परिच्छेद ७ येथे नमूद तरतूदीनुसार बाधित कुटुंबाना आर्थिक पॅकेजसाठी आवश्यक रकमेची परिगणना करणे, निधी उपलब्ध करणे आणि अंमलबजावणी करणे या संदर्भात प्रकल्पयंत्रणा जलसंपदा विभाग यांचे स्तरावर आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोरेगांव (मुंबई) देवीचा पाडा येथील आदिवासींच्या जमिनीवर फिल्मसिटीकडून अतिक्रमण करण्यात आल्याबाबत

**(१५) * ८३५०६ श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगांव (मुंबई) देवीचा पाडा येथील एका आदिवासीच्या जमिनीवर फिल्मसिटीकडून अतिक्रमण करण्यात येऊन त्यांचे राहते घर पाडण्यात आले असून शेत जमिनीवरील पिकांचेही नुकसान केले असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी आदिवासींनी स्थानिक पोलिसांना एफ.आय.आर.नोंदविण्याची विनंती करुनही त्यांच्याकडून कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर आदिवासीचे घर व त्यांची जमीन परत करण्याबाबत तसेच यातील दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

(२) दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव येथील सुमारे ५२१ एकर जमीन शासनाच्या मालकीची असून, सदर जमिनीवर चित्रपट सृष्टीच्या विकासाच्या दृष्टीने दादासाहेब फाळके चित्रनगरी येथे कामकाज सुरु आहे. महामंडळाची जागा गैरकृत्यासाठी वापरत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर सदरच्या जागेत उभे असलेले अनधिकृत पत्र्याचे शेड पाडण्याचे काम हाती घेण्यात आले. परंतु, महामंडळाच्या कामकाजामध्ये महामंडळाचे कर्मचारी श्री.किसन भगत यांनी अडथळा निर्माण केल्यामुळे श्री.गोविंद कवळे, सुरक्षा रक्षक, महाराष्ट्र सुरक्षा दल यांनी आरे पोलीस स्टेशन येथे अदखलपात्र गुन्हा नोंदणी क्र.१०१/२०२३, दिनांक २५.०१.२०२३ नुसार गुन्हा दाखल केला. श्री.किसन भगत हे महामंडळाच्या सेवेत असून, महामंडळाच्या स्थावर मालमत्तेचे नुकसान करुन महामंडळाच्या सुरक्षेमध्ये अडथळा आणत असल्यामुळे व त्यांची वर्तणूक ही महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील (एक), (तीन) चा भंग करणारी असल्याने श्री.किसन भगत, परिचर यांना महामंडळाच्या सेवेतून महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या भाग २ मधील ४ पोटनियम (१) अन्वये दिनांक ३१.०१.२०२३ अन्वये निलंबित करण्यात आलेले आहे आणि त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु आहे.” तसेच सदर प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट आहे.

(३) व (४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## मौ.डिस्कळ (ता.खटाव, जि.सातारा) येथे योग्य नोंदणीचे ऑनलाईन पद्धतीने ७/१२ मिळण्याबाबत

**(१६) * ७९८२४ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ. डिस्कळ (ता.खटाव, जि.सातारा) येथे ऑनलाईन पद्धतीने मिळणाऱ्या ७/१२ उताऱ्यावरील नोंदी चुकीच्या पद्धतीने शेतकऱ्यांना मिळत असल्याचे माहे मे, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्ह्यातील कार्यालयातून मिळणाऱ्या ७/१२ वरील नोंदी व ऑनलाईन पद्धतीने मिळणाऱ्या नोंदीमध्ये विसंगती असल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ऑनलाईन पद्धतीने चुकीच्या झालेल्या नोंदी दुरुस्त करण्यासाठी कलम १५५ नुसार कार्यवाही करायची असल्यास शेतकऱ्यांना शारीरिक, मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन येथील शेतकऱ्यांचा त्रास कमी होण्यासाठी योग्य नोंदणीचे ऑनलाईन पद्धतीने ७/१२ मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १५५ नुसार हस्तलिखीत ७/१२ व संगणकीकृत ७/१२ मधील तफावत दुरुस्ती करण्यासाठी शासनाने नि:शुल्क ऑनलाईन सेवा ई-हक्क या पोर्टलवर उपलब्ध करुन दिलेली आहे.

(४) डिजिटल स्वाक्षरीत ७/१२ मध्ये लेखन प्रमाद चूक असल्यास चूक दुरुस्त करण्यासाठी शेतकरी/नागरिकांना तलाठी कार्यालयात न जाता ऑनलाईन अर्ज दाखल करण्याची सुविधा ई-हक्क या प्रणालीद्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर प्रणालीमध्ये प्राप्त अर्ज तलाठी यांच्याकडून विहित नमुन्यात तहसीलदाराकडे पाठविणे व तहसीलदाराच्या निर्णयानुसार फेरफार घेऊन ७/१२ वरील लेखन प्रमाद दुरुस्ती करणे, अशी संपूर्ण संगणकीकृत ई-हक्क प्रणाली जमाबंदी आयुक्त कार्यालयाने विकसित करुन कार्यान्वित केलेली आहे. महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय दिनांक २५ जुलै, २०२३ अन्वये राज्यातील महसूल अधिकाऱ्यांना दिनांक ०१/०८/२०२३ पासून महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १५५ खालील लेखन प्रमाद दुरुस्ती अर्ज केवळ Online स्वरुपात घेण्याच्या सूचना जमाबंदी आयुक्त कार्यालयाचे पत्र दिनांक ३१/०७/२०२३ अन्वये देण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १५५ ऑनलाईन प्रकरणांच्या निपटारा करणेच्या सूचना पुनश्च: एकदा जमाबंदी आयुक्त कार्यालयाकडून दिनांक ०८/१०/२०२३ रोजीचे पत्रान्वये सर्व जिल्हाधिकारी यांना देण्यात आल्या आहेत.

राज्यातील सर्व तहसिल लॉगीनमध्ये प्राप्त होणाऱ्या अधिकार अभिलेख कामकाजात प्रथम प्राप्त प्रथम निर्गत (FIFO) हे तत्व दिनांक १ डिसेंबर, २०२३ पासून लागू करण्यात आले आहे. त्याबाबत तहसीलदार लॉगिनमध्ये कार्यवाही करण्यासाठी जमाबंदी आयुक्त कार्यालयाकडून दिनांक २२/११/२०२३ रोजी सर्व विभागीय आयुक्त यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील कोस्टल जिल्ह्यातील गावांचा गाव नकाशेच गायब असल्याने अनेक मच्छीमारांचे नुकसान झाल्याबाबत**

**(१७) * ८०२२७ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग आदि सात कोस्टल जिल्ह्यांतील गावांचे गाव नकाशे गायब असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सीआरझेड कायदा लागू झाल्यापासून कोस्टल जिल्ह्यातील झोन क्षेत्रातील गावनिहाय डिजिटल नकाशे तयार करण्याचे रु.१२ कोटीचे काम एका खाजगी संस्थेला माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आदेश देऊन ८ महिन्यांचा कालावधी उलटून गेला तरीही अद्याप गाव नकाशे अस्तित्वात आलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नकाशाअभावी हजारो हेक्टर जमिनीवर सीआरझेडचे उल्लंघन करुन विविध प्रकल्प कंपन्या व भांडवलदारांना देऊन त्यावर बांधकाम करुन कोट्यवधींचा नफा कमावला जात असल्याचे महाराष्ट्र स्मॉल स्केल ट्रॅडिशनल फिश वर्कर संघटनेने माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आणले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या बांधकामांमुळे पर्यावरणाची हानी होवून स्थानिक नागरिक व मच्छिमारांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन तात्काळ कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) सीआरझेड अधिसूचना २०१९ अंतर्गत केंद्र शासनाने मंजूर केलेल्या किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडे (CZMP) हे १:४००० प्रमाणात तयार करण्याचे काम केंद्र शासनाच्या नॅशनल सेंटर फॉर सस्टेनेबल कोस्टल मॅनेजमेंट, चैनई या प्राधिकृत संस्थेव्दारे सुरू असून महाराष्ट्र कोस्टल झोन ॲथॉरिटी, मुंबई हे प्राधिकरण पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या अखत्यारित आहे.

(४) महाराष्ट्र स्मॉल स्केल ट्रॅडिशनल फिश वर्कर संघटनेने दिनांक २३.०३.२०२४ रोजीच्या निवेदनातील नमूद मागण्या या नियोजन प्राधिकरण सिडको महामंडळ व महाराष्ट्र कोस्टल झोन ॲथॉरिटी, मुंबई यांचेशी संबंधित असल्याने सदरचे निवेदन जिल्हाधिकारी, रायगड यांचेमार्फत पुढील कार्यवाहीसाठी सिडको महामंडळ व महाराष्ट्र कोस्टल झोन ॲथॉरिटी, मुंबई यांच्याकडे दिनांक १०.०६.२०२४ च्या पत्रान्वये पाठविण्यात आलेले आहे.

(५) व (६) राज्याच्या समुद्रकिनारी असलेल्या जिल्हयांमधील सर्व महसूली गावांचे सर्वे नंबर व गट नंबरचे गांव नकाशे भूमी अभिलेख विभागाकडे उपलब्ध आहेत व ते डिजीटाईज्ड करण्यात आले असून भूनक्शा पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

-----------------

## राज्यात विजेची पूर्वसूचना देणारी यंत्रणा बसविण्याबाबत

**(१८) * ७९९७६ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **आपत्ती व्यवस्थापन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वीज कोसळून शेकडो शेतकऱ्यांचे मृत्यू होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या सन २०२२ च्या आकडेवारीनुसार २३९ जणांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वीज कोसळून शेतकऱ्यांचे होणारे मृत्यू रोखण्याकरिता परदेशात वापरण्यात येणाऱ्या अवघ्या १० लाख किंमतीच्या यंत्रामुळे सुमारे २५० किलोमीटर क्षेत्रफळात ४५ मिनिट अगोदर वीज कोसळण्याची पूर्वसूचना देण्यात येत असल्याने ही यंत्रे राज्यात आवश्यक त्या ठिकाणी बसविल्यास वीज कोसळून नाहक होणारे मृत्यू टाळता येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू यंत्रणा खरेदी करण्यास शासन दिरंगाई करीत असल्याचे पत्र लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, मा.उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री, मा.कृषी मंत्री व मा.मदत व पुनर्वसन मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना माहे एप्रिल व मे, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सदर यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) राज्यात वीज कोसळण्याची पूर्वसुचना देणारी यंत्रे बसविल्यास वीज कोसळून होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण कमी करता येईल, ही बाब शासन स्तरावर विचाराधीन आहे.

(४), (५) व (६) वीज कोसळण्याची पूर्वसुचना देण्यारी यंत्रे बसविण्याबाबत शासन दिरंगाई करीत असल्याबाबतचे निवेदन मा. मुख्यमंत्री, मा. उप मुख्यमंत्री तथा मा. मंत्री वित्त, मा. मंत्री कृषी, मा. मंत्री, मदत व पुनर्वसन यांचे कार्यालय तसेच विभागास प्राप्त झाल्याची नोंद दिसून येत नाही.

-----------------

## मौ. नुल-येणेचवंडी (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) येथे अवैध पध्दतीने सुरु असलेले स्टोन क्रशर बंद करण्याबाबत

**(१९) * ८३२६७ श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ. नुल-येणेचवंडी (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) येथे अवैध पध्दतीने स्टोन क्रशर सुरु असल्याचे माहे मे, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अवैध स्टोन क्रशर विरोधात येथील ग्रामस्थांकडून ६६ हरकती दाखल असताना देखील त्याचे निराकरण न करता येथील प्रशासनाने ना-हरकत प्रमाणपत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या क्रशर परिसरातील विहिरी व कुपनलीकातील पाण्याचा वापर येथील नागरिक पिण्यासाठी करत असून प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होत असल्याने याबाबत स्थानिक लोकप्रतीनिधींना व प्रशासकीय यंत्रणांना निवेदन देवून स्टोन क्रशर बंद करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवैध स्टोन क्रशर कायमस्वरुपी बंद करण्याबाबत तसेच संबंधितांवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) मौजे कसबा नुल ता.गडहिंग्लज येथील ग.नं.९९८ मध्ये संबंधित क्रशरधारकाने ग्रामपंचायत कसबा नुल ता.गडहिंग्लज यांच्याकडे ना-हरकत दाखला मागणी केली असता, ग्रामपंचायत कसबा नुल यांच्याकडे वैयक्तीक लेखी स्वरूपाच्या ५० व १६ इतर नागरिकांच्या संयुक्त सह्याचे हरकत निवेदन दाखल केले. सदर हरकती विचारात घेवून, ध्वनीप्रदूषण, वायू प्रदूषण शेतीचे नुकसान होऊ शकते अगर कसे याबाबत तांत्रिक अभिप्राय महाराष्ट्र प्रदूषण महामंडळ विभागीय कार्यालय व इतर संबंधित प्राधिकरण यांनी पूर्वपरवानगी घेण्याचे अटीस अधीन राहून ग्रामपंचायत कसबा नुल यांनी दिनांक २०.११.२०२० रोजी नाहरकत दाखल दिला आहे.

प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण, नियंत्रण मंडळ, प्रादेशिक कार्यालय कोल्हापूर यांनी संबंधित स्टोन क्रशरला स्थापन करण्याकरीता दिनांक ०३.०५.२०२१ रोजी व सुरू करण्यास दिनांक २४.०२.२०२३ रोजी ना-हरकत प्रमाणपत्र दिले असून त्याची मुदत दिनांक ३१.१०.२०२६ पर्यंत असल्याचे दिसून येते.

दरम्यान ग्रामपंचायत कसबा नुल यांनी दिनांक ०६.०२.२०२३ रोजी क्रशरधारक यांना क्रशर कायमस्वरूपी बंद करण्याबाबत नोटीस देण्यात आली असता, संबंधित क्रशरधारक यांनी सदर नोटीस मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्रमांक ४७६९/२०२३ अन्वये अव्हानित करण्यात आली असता मा.न्यायालयाने सदर नोटीसीस स्थगिती दिली आहे.

दिनांक १८.०६.२०२४ रोजीचा महाराष्ट्र भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा कोल्हापूर यांचा रासायनिक पृथ्थ:करणचा अहवाल घेण्यात आलेला असून त्यात सदर गावातील पाणी पिण्या योग्य (Fit) असल्याचा निष्कर्ष नमूद केलेला आहे. तसेच दिनांक २१.०६.२०२४ रोजीचा कार्यकारी अभियंता, ग्रामिण पाणीपुरवठा विभाग जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्याकडून अहवाल घेण्यात आलेला असून पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतावर कोणताही दुष्परिणाम झाल्याबाबत ग्रामपंचायतीचे निवेदन प्राप्त झालेले नाही. तसेच संबंधित ग्रामपंचायत क्षेत्रातील पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत बाधित होत नसल्याबाबत संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्राने लेखी कळविलेले आहे.

(५) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## कोयना (जि.सातारा) येथील सह्याद्री व्याघ्र प्रकल्पालगत असलेल्या जमिनींवर अवैधरित्या बांधकाम केल्याबाबत

**(२०) * ८४३९९ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोयना (जि.सातारा) येथील कांदाटी खोऱ्यातील सह्याद्री व्याघ्र प्रकाल्पालगत असलेल्या झाडाणी (महाबळेश्वर) गावातील अतिसंवेदनशील क्षेत्रातील सुमारे ६४० एकर जमीन उच्च पदस्थ अधिकारी व अन्य १३ व्यक्तींनी अत्यल्प दरात खरेदी केल्याचे माहे मे, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अतिसंवेदनशील क्षेत्रातील जमिनीवर मोठ्या प्रमाणात अवैधरित्या बांधकाम करुन कमाल मर्यादेचे देखील उल्लंघन करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२) व (३) मौजे झाडाणी, ता.महाबळेश्वर, जि.सातारा येथे एकूण १३ खातेदारांनी अंदाजे एकूण २१४.५०.१९ हे.आर (५३६.२५.४७ एकर) इतकी जमीन खरेदी केल्याचे तसेच सदर

क्षेत्रात ७५५० चौरस फूट जागेमध्ये अनधिकृत बांधकाम केल्याची बाब माहे मे, २०२४ दरम्यान निदर्शनास आली आहे.

मौजे झाडाणी येथील उक्त जमिनीबाबत महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ मधील तरतुदीनुसार जमिन धारणेच्या कमाल मर्यादेपेक्षा जास्त जमिन धारण केल्याच्या अनुषंगाने संबंधितांना नोटीस देऊन, अपर जिल्हाधिकारी, सातारा यांच्या स्तरावर दिनांक ११/०६/२०२४ व २०/०६/२०२४ रोजी सुनावणी आयोजित केली. तसेच या क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाबाबत नियमानुसार कार्यवाही करण्याकरीता जिल्हाधिकारी, सातारा यांनी दिनांक १२/०६/२०२४ च्या आदेशान्वये संबंधितांना निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार अनधिकृत बांधकामधारकांना महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने नियोजन प्राधिकरण म्हणून नोटीस बजावली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जत (जि.सांगली) तालुक्यात वाळू तस्करांची दहशत वाढल्याबाबत

**(२१)** * **८०९५२ श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत (जि.सांगली) तालुक्यात महसूल प्रशासन तसेच पोलिसांच्या दुर्लक्षामुळे वाळू तस्करांची दहशत वाढली असून यामुळे करजगी व खंडनाळ येथे एका व्यक्तीचा बळी गेला असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जत पूर्व भागातील गावाजवळ बोर नदीचे पात्र असून या ओढापात्रात बांधकामासाठी अवैध वाळू उपसा करण्यात येत असल्याने मोठमोठे खड्डे पडले असून यामधे जास्त मोबदला मिळत असल्याने रात्रंदिवस वाळू उपसा सुरु असून संबंधित महसूल, पोलीस प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधितांवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) मौजे दरीबडची येथील मोडी वस्तीजवळील बोर नदी पात्रात मौजे दरीबडची गावांतील दोन व्यक्तींनी जबरदस्तीने अवैध वाळू व्यवसाय करण्याकरीता मयत इसम यांना घेवून गेले असता खोल खड्यात वाळू उपशाचे काम करीत असताना वाळूचा ढिगारा कोसळल्याने ढिगाऱ्यात सापडून त्यांचा मृत्यू झाला असल्याबाबतची फिर्याद मयत व्यक्तीच्या भावाने जत पोलीस ठाणे येथे दिल्याने संबंधितांवर भ.द.वि.स. कलम ३०४ (२) ३७९, ५११, ३४ प्रमाणे गु.र.नं. ८७४/२०२३ गुन्हा दाखल केला असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) अवैध उत्खनन व वाहतूकीवर आळा घालण्यासाठी तहसिलदार जत व अपर तहसिलदार, संख, ता.जत यांना जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत वेळोवेळी सूचना देण्यात येवून त्यानुसार त्यांनी दिनांक ०१/०१/२०२४ च्या आदेशान्वये गस्ती पथकांची स्थापना केली असून सदर पथकामार्फत गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक होऊ नये याबाबत वेळोवेळी गस्त घालून कारवाई करण्यात येते.

सन २०२३-२४ मध्ये जत उपविभागात अनधिकृत गौण खनिज उत्खनन करणाऱ्या ११ वाहनांवर दंडात्मक कारवाई केली असून अवैध उत्खनन वाहतूक होणार नाही याची खबरदारी घेण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

## राज्यातील मत्स्यव्यवसाय बंदरे सुसज्ज व सुस्थितीत करण्याबाबत

**(२२) * ८२६४१ श्री.विनोद निकोले (डहाणू), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र सागरी मासेमारी अधिनियम, १९८१ हा कायदा दिनांक ४ ऑगस्ट, १९८२ पासून राज्यात अंमलात आला असून, सदर कायद्याच्या अंमलबजावणीनंतर मासे उतरविण्यासाठी राज्यात १७३ मत्स्यव्यवसाय बंदरे कार्यान्वित करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सर्व बंदरांची देखभाल व दुरुस्ती नियमित होत नसून अनेक बंदरे मोठ्या प्रमाणात गाळाने भरलेली असून मच्छिमारांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे मासेमारी करण्यासाठी उक्त बंदरांचा वापर मच्छिमारांना करता येत नसल्याने त्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सदर १७३ बंदरातील गाळ काढणे, देखभाल व दुरुस्ती करणेसह ही बंदरे २४ तास सुरु ठेवण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) मासळी उतरविण्याच्या केंद्राजवळील खाडीत साचलेल्या गाळाचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. नियुक्त करण्यात आलेल्या यंत्रणेव्दारे आधुनिक यंत्रसामुग्री (ड्रोन, DGPS, Bathymetre etc.) सर्वेक्षण करण्यात आले. त्यांच्यामार्फत २० मासळी उतरविण्याच्या केंद्राजवळील खाडीतील गाळ काढण्याच्या कामाचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आले आहेत. यामध्ये २० खाड्यांच्या गाळाचे एकूण रू.६५.६९ कोटी एवढा निधी आवश्यक आहे. सदर कामाचे सविस्तर प्रकल्प अहवाल व अंदाजपत्रके राष्ट्रीय मत्स्यकी विकास बोर्ड, हैद्राबाद यांना मंजूरीस्तव पाठविण्यात आले आहेत. मान्यता मिळाल्यानंतर गाळ काढण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पेण (जि.रायगड) तालुक्यातील दादर येथे भूमाफियांनी गैरव्यवहार केल्याबाबत

**(२३) * ८०९१० श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) तालुक्यातील दादर येथे सरकारी अधिकारी व कर्मचारी यांच्याशी संगनमत करुन भूमाफियांनी सुमारे १०० कोटी रुपयांच्या जमिनीचा गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी सामाजिक कार्यकर्ते श्री.विजय पाटील यांनी प्रांत अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार केल्यानुसार तहसिलदार, पेण यांना चौकशी करण्याचे आदेश माहे जानेवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) व (४) अर्जदार श्री.विजय पाटील यांनी उपविभागीय अधिकारी, पेण यांना दिनांक २०.१०.२०२३ च्या पत्रान्वये सरकारी आकारी पड स.नं.३६२/१ ते ३६२/३५, स.नं.२९६/३,

२०३/३/अ व स.नं.३५३/७ या जमिनीबाबत चौकशी करुन दोषींवर कायदेशीर कारवाई होण्याबाबत तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यानुषंगाने तहसिलदार, पेण यांनी तपासणी केली असता मौजे दादर ता.पेण येथील स.नं.३६२/१ ते ३६२/३५, २९६/३, २०३/३/अ व ३५३/७ या जमिनीपैकी स.नं.३६२/२७ ते ३६२/३५ या मिळकती नव्याने फेरफार घडवून नवीन ७/१२ तुकडा तयार करुन अंमल दिल्याचे आढळून आले उक्त फेरफार संशयास्पद असल्याचे दिसून आल्याने तसेच स.नं.२९६/३, २०३/३/अ व स.नं.२३५/७ या मिळकती हस्तलिखीत ७/१२ उताऱ्यावर मूळ मालकांना खाडाखोड करुन दाखल केल्याचे दिसून आल्याने या प्रकरणी उपविभागीय अधिकारी, पेण यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम २४७ अन्वये दिनांक १२.०६.२०२४ चे आदेशान्वये उक्त मिळकतीच्या अनुषंगाने घेण्यात आलेले फेरफार रद्द करण्यात आले असून अनाधिकाराने घडविण्यात आलेले सर्व अधिकार अभिलेख रद्द करण्यात आले आहेत.

तसेच प्रस्तुत प्रकरणी अनियमिततेबाबत जबाबदार असलेले संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचा विभागीय चौकशीबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, रायगड यांचे कार्यालयास सादर करण्याबाबत उपविभागीय अधिकारी, पेण यांना जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अवगत करण्यात आले आहे.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील अलिबाग-विरार कॉरिडोर प्रकल्पबाधितांना तातडीने अनुदान देण्याबाबत

**(२४)** * **८४४३६ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग-विरार (जि.रायगड) येथील कॉरिडोर प्रकल्पासाठी संपादित करण्यात आलेल्या गुरचरण जागेत वर्षानुवर्ष वास्तव करीत असलेल्या प्रकल्पबाधितांना अद्यापपर्यंत अनुदान मिळाले नसल्याचे माहे मे, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्ह्यातील बहुतांशी प्रकल्पबाधितांना जमिनी संपादन करण्याच्या नोटीसा संबंधित विभागाने दिल्या असून संपादित करण्यात आलेल्या गुरचरण जागेमध्ये वास्तव करीत असलेल्या प्रकल्प बाधितांना अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारच्या नोटीसा अथवा सूचना देण्यात आल्या नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जिल्ह्यातील गुरचरण जागेमधील प्रकल्प बाधितांच्या घरांचे उक्त विभागातील सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत मूल्यांकन करुन बराच कालावधी होऊन सुद्धा प्रकल्पबाधित लोक अनुदानापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रकल्प बाधितांना तातडीने अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) (२) (३) व (४) शासनाच्या प्रकल्पाकरीता आवश्यक असलेली शासकीय जमीन ही संपादन होत नसून, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे तरतूदीनुसार तसेच महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ चे तरतुदीनुसार संबंधित यंत्रणेकडे जमीन हस्तांतरीत करण्यात येते.

रायगड जिल्ह्यातील सरकारी जमीन हस्तांतरणाचे अनुषंगाने अतिरीक्त महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई यांनी मागणी केलेल्या अलिबाग, पेण व पनवेल मधील गुरचरण जमिनीपैकी अलिबाग तालुक्यातील गुरचरण जमिनीवर एकूण ८६ अतिक्रमणधारकांनी घरांकरिता अतिक्रमण केल्याचे दिसून येते. तसेच

पनवेल तालुक्यातील गुरचरण जमिनीवर एकूण २७ अतिक्रमणधारकांनी घरांसाठी अतिक्रमण केल्याचे दिसून येते. याप्रकरणी गुरचरण जमिनीवरील घरांच्या अतिक्रमणाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, रायगड यांचेमार्फत संपादनाच्या अनुषंगाने/मोबदल्याच्या अनुषंगाने कळविण्यात आलेले नाही.

ठाणे जिल्ह्यातील कल्याण मधील सदर प्रकल्पासाठी आठ गावातील जमीन संपादीत करण्यात येत आहेत पैकी पाच गावांमधील गुरचरण जमीन प्रस्तावित विरार-अलिबाग बहुउद्येशीय प्रकल्पांतर्गत बाधीत होत असून सदर जमीन मागणी प्रस्ताव महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून प्राप्त झाला आहे. सदर मिळकतीवर बांधकामे असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांची कागदपत्रे/पुरावे पडताळणी करुन उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

पालघर जिल्ह्यातील वसई तालुक्यातून विरार अलिबाग बहुउद्देशीय मार्गिका जात असून गुरचरण मधील भूसंपादीत क्षेत्राबाबतचा प्रस्ताव संपादन संस्थेकडून जिल्हाधिकारी, पालघर कार्यालयाकडे प्राप्त नाही. तसेच वर्षानुवर्ष गुरचरण जागेत वास्तव्य करीत असलेल्या प्रकल्पबाधितांना अनुदान देणेबाबतची बाब पालघर जिल्ह्यात दिसून येत नाही.

गुरचरण जमिनीबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्र.०२/२०२२ दाखल असून सदर बाब न्यायप्रविष्ठ आहे. उक्त जनहित याचिकेमधील होणाऱ्या निर्णयास अनुसरुन गायरान/गुरचरण जमिनीवरील अतिक्रमणाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याचे विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.